## दै नंदिनी

● **सांगीतिक :** ‘अमृत वर्षा’स्वरसोहळा, पं. सत्यशील देशपांडे यांच्या पंचाहत्तरीनिमित्त सन्मान सोहळा, पं. मधुप मुदगल यांचे गायन, पं. राजा काळे यांच्याशी ‘संगीत संवाद’, (सकाळी ९.३०), पं. सत्यशील देशपांडे यांचा सन्मान, प्रमुख उपस्थिती - जयंत जोशी, पं. शमा भाटे, पं. देशपांडे यांच्याशी ‘स्वर संवाद’, संवादक - डॉ. समीर दुबळे, बंदिश, सादरकर्ते - पं. देशपांडे, सहकलाकार - पं. अरविंद थत्ते, गौतम टेंभेकर, धनंजय खरवंडीकर, लीलाधर चक्रदेव, (सायं. ५), स्थळ - ज्योत्स्ना भोळे सभागृह, हिराबाग, टिळक रस्ता

● **गांधी दर्शन शिबिर :** महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दल, ३३ वे गांधी दर्शन शिबिर, व्याख्यान, विषय - वारकरी संप्रदाय आणि सद्यःस्थिती, वक्ते - विकास लवांडे, व्याख्यान, विषय - न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे व्यक्ती आणि कार्य, वक्ते - प्रा. मिलिंद जोशी, चित्रपट - मुक्ता, अध्यक्ष - डॉ. कुमार सप्तर्षी, स्थळ - गांधी भवन, कोथरूड, सकाळी १० ते सायं. ५

● **प्रदर्शन :** अक्षरधारा बुक गॅलरी, राजहंस प्रकाशन, मान्सून पुस्तक महोत्सव, स्थळ - आचार्य अत्रे सभागृह, सुभाषनगर, बाजीराव रस्ता, सकाळी १०.३० ते रात्री ८.३०

● **पुरस्कार प्रदान :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, शुभांगी देशपांडे यांना ‘आगरकर स्मृती पुरस्कार’, अनुराधा काळे यांना ‘दाभोलकर कार्यकर्ता पुरस्कार’, हस्ते - गीताली वि. मं. अध्यक्ष - प्रा. मिलिंद जोशी, स्थळ - अक्षरवेल सभागृह, रामबाग कॉलनी, सदाशिव पेठ, सकाळी ११

● **पुरस्कार प्रदान :** हिंदू महिला सभा, ग्रिहिथा विचारे हिला साहस पुरस्कार, सीमा शिंदे यांना सजग पुरस्कार, आदिती पारठे हिला तेजस्विनी पुरस्कार, हस्ते - उमेश झिरपे, डॉ. सविता केळकर, पुरस्कारार्थींची मुलाखत, मुलाखतकार - शुभांगी दामले, स्थळ - भावे प्राथमिक शाळेचे सभागृह, रेणुका स्वरूप शाळेमागे, सदाशिव पेठ, सायं. ५

● **सांगीतिक :** ओंकार सूरमंडल प्रस्तुत, पं. कै. के. जी. गिंडे जन्मशताब्दी स्मृती संध्या, डॉ. पल्लवी पोटे, पं. डॉ. राम देशपांडे यांचे गायन, प्रमुख उपस्थिती - पं. केशव गिंडे, स्थळ - भावे हायस्कूल, प्र. ल. गावडे सभागृह, पेरुगेट, सदाशिव पेठ, सायं. ५.३०

● **वाद्यपूजन :** शिवगर्जना पथक, रौप्यमहोत्सवी वर्ष, वाद्यपूजन आणि सराव शुभारंभ, स्थळ - शिंदे हायस्कूलचे मैदान, तळजाई पायथा, सहकारनगर, सायं. ६

● **प्रकाशन :** रोहन प्रकाशन, मॉडेल रेल्वे सोसायटी, डॉ. शिरीष यंदे, हेमंत जोगदेव, आशिष कुवेलकरलिखित ‘रेल्वे : भारताची जीवनरेखा’ भारतीय रेल्वेचे अंतरंग उलगडणारा सर्वांगीण पट, हस्ते - डॉ. केतन गोखले, प्रमुख वक्ते - रोहित चंदावरकर, स्थळ - भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, नवलमल फिरोदिया सभागृह, विधी महाविद्यालय रस्ता, सायं. ६

# व्हिएतनाममध्ये बोट उलटून १५ भारतीय पर्यटकांचा मृत्यू

**पीटीआय, हनोई**

**व्हिएतनाममधील प्रसिद्ध** फु क्युओक बेटाजवळ स्पीड बोट दुर्घटनेत तमिळनाडू, केरळ आणि आंध्र प्रदेशातील १५ पर्यटकांचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी घडली. या बोटीत ३२ भारतीय पर्यटक आणि ४ कर्मचारी होते. दुर्घटनेनंतर जवळपासच्या पर्यटक बोटींमधील कर्मचाऱ्यांनी बुडालेल्या २१ जणांना बाहेर काढले. यात दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे वृत्त स्थानिक माध्यमांनी दिले आहे.

फु क्युओक हे व्हिएतनामचे सर्वात मोठे बेट असून, पांढऱ्या वाळूचे समुद्रकिनारे, प्रवाळ खडक आणि बेटांची सफर यासाठी प्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. फु क्युओकच्या किनाऱ्यालगत असलेल्या आन थोई द्वीपसमूहातील होन माय रुत नोआई या बेटापासून सुमारे ४० मीटर अंतरावर ही स्पीडबोट उलटली, असे वृत्त ‘व्हीएन एक्स्प्रेस इंटरनॅशनल’ने दिले आहे.



### मोबाइल विक्रेते, वितरकांची सहल

लाव्हा मोबाइल कंपनीचे विक्रेते, वितरक आणि कर्मचाऱ्यांसाठी कंपनीच्या वतीने ही सहल आयोजित करण्यात आली होती. होन माय रुत एनगोई बीचवर दुपारी दीडच्या सुमारास या पर्यटकांना फिरवण्यासाठी तीन बोटी ठरवण्यात आल्या होत्या. त्यातील एका गटाला घेऊन बोट पुढे निघाली. ही बोट किनाऱ्यापासून अवघ्या तीनशे-चारशे मीटरवर असतानाच ती उलटली. यावेळी उर्वरित दोन्ही गटांतील पर्यटक किनाऱ्यावरच फोटो काढत होते, असे या दुर्घटनेचे प्रत्यक्षदर्शी आणि आंध्रप्रदेशच्या गुंटुर येथील मोबाइल वितरक आशिष कुमार यांनी सांगितले.

सीमासुरक्षा दल, नौदल, तटरक्षक दल आणि इतर यंत्रणा घटनास्थळी दाखल होण्यापूर्वीच जवळपासच्या पर्यटक बोटी मदतीसाठी धावून गेल्या. ‘जेट स्की’द्वारे वाचवलेल्या लोकांना किनाऱ्यावर आणण्यात आले. मृतांमध्ये १३ पुरुष आणि २ महिलांचा समावेश आहे. तीव्र लाटा आणि वाऱ्यामुळे ही बोट उलटल्याचे सांगितले जाते. मृतांमध्ये तमिळनाडूतील १० , आंध्र प्रदेशचे ३ आणि केरळमधील २ नागरिकांचा समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त करत भारतीय दूतावास आणि वाणिज्य दूतावासाकडून शक्य ती सर्व मदत पुरवली जात असल्याचे ‘एक्स’वर सांगितले. हो ची मिन्ह सिटी येथील भारताच्या महावाणिज्य दूतावास व हनोईतील दूतावासात मदतीसाठी नियंत्रण कक्ष स्थापन केले आहेत.

## ज्येष्ठ गायिका एस. जानकी यांचे निधन

**म्हैसूर :** ज्येष्ठ पार्श्वगायिका एस. जानकी यांचे दीर्घ आजाराने एका खासगी रुग्णालयात निधन झाले. त्या ८८ वर्षांच्या होत्या. शुक्रवारी रात्री त्यांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.



या वेळी उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. अष्टपैलू गायकीसाठी ओळखल्या जाणाऱ्या जानकी यांची विविध भाषांमधील ४८ हजारहून अधिक गाणी ध्वनिमुद्रित आहेत. सहा दशकांच्या कारकिर्दीत त्यांनी चित्रपट, दूरचित्रवाणीवाहिनी आणि रेडिओसाठी २० भारतीय भाषांत गाणी गायली आहेत.

## ‘सीएमडीए’ पुणेच्या अध्यक्षपदी जगदाळे

**पुणे :** कम्प्युटर्स अँड मीडिया डीलर्स असोसिएशन पुणेच्या (सीएमडीए) अध्यक्षपदी आनंद जगदाळे यांची, तर सचिवपदी संदीप जगदाळे यांची निवड करण्यात आली.

‘सीएमडीए’ पुणेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत २०२६-२७ या वर्षासाठी नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. या कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी सीबा पाठक, खजिनदारपदी राजेंद्र पाटील, सहखजिनदारपदी विजय वाघमारे, सहसचिवपदी शशिकांत नेवासे यांची निवड करण्यात आली. सचिन साळुंखे, सतीश जगताप, परेश लोढा, विनय पुजारी, विक्रांत भोसले, अशोक पाटील आणि प्रीती दरणे यांचा नव्या कार्यकारिणीत समावेश आहे. महेश मोरे, राहुल खुर्द आणि जयंत शेटे यांची सल्लागार समितीत नियुक्ती करण्यात आली आहे.


कॅनरा बँक Canara Bank
सिंडिकेट Syndicate

**भारत सरकारचा एक उपक्रम**

**एआरएम शाखा - मुंबई,** कॅनरा बँक बिल्डिंग, चौथा मजला, आदि मर्झबान पथ, बॅलार्ड इस्टेट, मुंबई - 400001. **ईमेल :** cb2360@canarabank.com **दूरध्वनी -** 8655948054/19 **संकेतस्थळ :** www.canarabank.com

**विक्री सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 च्या नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

याद्वारे कर्जदार व जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भारग्रस्त असलेल्या खाली नमूद अचल मालमत्तांचा कॅनरा बँक च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी **प्रत्यक्ष ताबा** घेतलेला असून या मालमत्तांची विक्री, मे. एस. एस. पाटील कार्गो कॅरियर्स, नोंद. पत्ता - डी-5087, पाचवा मजला, बिमा कॉम्प्लेक्स, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र - 410218, यांचेकडून कॅनरा बँक च्या एआरएम शाखा, यांना घेणे असलेल्या देय रक्कम **रु. 2,45,26,088.54 (रुपये दोन कोटी पंचेचाळीस लाख सव्वीस हजार अठ्ठ्याऐंशी आणि चौपन्न पैसे फक्त)** (**दि. 28.02.2026** रोजी नुसार सोबत **01.03.2026** पासून अतिरिक्त व्याज आणि शुल्क या थकबाकी रकमेच्या वसुलीसाठी **"जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे"** या तत्वावर दि. 31.07.2026 रोजी विक्री करण्यात येईल.

| अ. क्र. | मालमत्तेचे वर्णन | आरक्षित किंमत | बयाणा रक्कम ठेव |
|---|---|---|---|
| 1 | कार्यालय क्र. 1, पहिला मजला, ‘‘निर्माण आर्केड’’ ब्लॉक क्र. बी-6, भक्ती शक्ती चौक, ट्रान्सपोर्ट नगर, मुंबई पंढरपूर रोड, निगडी, पिंपरी चिंचवड, पुणे - 411029. | रु. 16,23,550/- | रु. 1,62,355/- |
| 2 | कार्यालय क्र. 2, पहिला मजला, ‘‘निर्माण आर्केड’’ ब्लॉक क्र. बी-6, भक्ती शक्ती चौक, ट्रान्सपोर्ट नगर, मुंबई पंढरपूर रोड, निगडी, पिंपरी चिंचवड, पुणे - 411029. | रु. 16,23,550/- | रु. 1,62,355/- |
| 3 | कार्यालय क्र. 3, पहिला मजला, ‘‘निर्माण आर्केड’’ ब्लॉक क्र. बी-6, भक्ती शक्ती चौक, ट्रान्सपोर्ट नगर, मुंबई पंढरपूर रोड, निगडी, पिंपरी चिंचवड, पुणे - 411029. | रु. 16,23,550/- | रु. 1,62,355/- |
| 4 | कार्यालय क्र. 4, पहिला मजला, ‘‘निर्माण आर्केड’’ ब्लॉक क्र. बी-6, भक्ती शक्ती चौक, ट्रान्सपोर्ट नगर, मुंबई पंढरपूर रोड, निगडी, पिंपरी चिंचवड, पुणे - 411029. | रु. 16,23,550/- | रु. 1,62,355/- |

बयाणा रक्कम ठेव दि. **30.07.2026** रोजी सायं. **5.00** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी जमा करण्यात यावी.
बयाणा रकमेचा तपशील आणि इतर दस्तावेज सेवा पुरवठादारांकडे **दि. 30.07.2026** रोजी सायं. **5.00** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सादर करण्यात यावेत. बँकेकडे दस्तावेज **दि. 30.07.2026** रोजी सायं. **5.00** वाजेपर्यंत सादर करावेत.
विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया कॅनरा बँकेच्या वेबसाईटवर (www.canarabank.com) दिलेली **’ई-लिलाव’** लिंक पाहावी किंवा श्री. सुदर्शन जोशी, मुख्य व्यवस्थापक, कॅनरा बँक, एआरएम शाखा, मुंबई (मोबाइल क्र. 8655948054) किंवा कु. पायल वर्मा, अधिकारी, (मोबाइल क्र. : 8368869727) ई-मेल आयडी : cb2360@canarabank.com यांचेशी कोणत्याही कामकाजाच्या दिवशी कामकाजाच्या वेळेत संपर्क साधावा किंवा सेवा पुरवठादार Baanknet. (मे. पीएसबी अलायन्स प्रा. लि.), (संपर्क क्र. 7046612345 / 6354910172 / 8291220220 / 9892219848 / 8160205051, ईमेल : support.baanknet@psballiance.com / support.baanknet@procure247.com) यांचेशी संपर्क साधावा.

**दिनांक :** 10.07.2026 — स्वा./- प्राधिकृत अधिकारी,
**स्थान :** मुंबई — **कॅनरा बँक, एआरएम शाखा**


## मोशी दुर्घटनेतील सात जणांचे मृतदेह हाती


*(पान १ वरून)*

झाला आहे. मोशी दुर्घटनेत कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली दबलेल्या नऊ कामगारांची बुधवारी सुखरूप सुटका करण्यात आली होती. गुरुवारी सकाळी भावेश वाणी यांचा मृतदेह सापडला. ढिगाऱ्याखाली दबलेल्या अन्य आठ कामगारांना बाहेर काढण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या मार्गदर्शनाखाली बचावकार्य राबविण्यात येत होते. दुर्घटनाग्रस्त इमारतीचा कॉंक्रिटचा भाग फोडून शनिवारी शोधकार्य राबविण्यात आले. त्यामध्ये सात जणांचे मृतदेह सापडले.

अक्षय सावंत (वय ३५, रा.मोशी), सुनील कोरके (वय ४०, आळंदी), सन्नी माने (वय ३९, गंधर्वनगरी, मोशी), महेश कुंभार (वय ३३, छत्रपती संभाजीनगर), नागेश गायकवाड (वय २६, संजय गांधीनगर, मोशी), रणजित पाटील (वय २२, मोशी) आणि राहुल गायकवाड यांचे मृतदेह सापडले आहेत. मृतदेहांचे वायसीएम रुग्णालयात विच्छेदन केले जाणार आहे. त्यानंतर पोलिसांकडून मृतदेह नातेवाइकांकडे सुपूर्द करण्यात येतील.

### कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली शोधकार्य सुरू

इमारतीच्या बाजूला असलेल्या ढिगाऱ्याखाली दबलेल्या वामन कसबे यांचा शोध सुरू असल्याचे महापालिका प्रशासनाने सांगितले. कसबे कचरा डेपोतील रस्त्यावरून खाली उतरत होते. त्या वेळी त्यांच्या अंगावर कचऱ्याचा ढीग पडला आहे. त्यांचा रात्री उशिरापर्यंत शोध सुरू होता.



### चार दिवस शोधकार्य

कचऱ्याचा ढिगारा कोसळल्याने इमारत ढासळली होती. या इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा अडकला होता. जेवढा कचरा उचलला जात होता, तेवढाच डोंगरावरून कोसळून खाली येत होता. त्यामुळे कचऱ्याचा ढिगारा उपसताना यंत्रणांची दमछाक झाली. तीन दिवसांच्या शोधकार्यानंतरही कोणाचाही शोध लागत नसल्याने शनिवारी दुर्घटनाग्रस्त इमारतीचा कॉंक्रिटचा भाग फोडण्यात आला. त्यामुळे जवानांना आतमध्ये शिरण्यासाठी मार्ग मिळाला. त्यानंतर शनिवारी दुपारपासून मृतदेह सापडण्यास सुरुवात झाली. दुपारी अडीच वाजता एक मृतदेह सापडला. आठ वाजेपर्यंत सात जणांचे मृतदेह सापडले.

### इमारतीखालील शोधकार्य थांबवले

मोशी दुर्घटनेतील इमारतीखालील शोधकार्य शनिवारी ७७ तासांनी संपले. बुधवारपासून लष्कर, एनडीआरएफ, अग्निशमन विभाग, पोलिसांच्या माध्यमातून शोधकार्य राबविण्यात आले.

# शिक्षक पदोन्नती प्रक्रिया स्थगित

### उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर प्राथमिक शिक्षण संचालकांचा आदेश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्यातील विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, पदवीधर शिक्षक यांच्या पदोन्नतीबाबत प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे १४ मे रोजीचे पत्र उच्च न्यायालयाने रद्द केले. त्यामुळे विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, पदवीधर शिक्षक यांच्या पदोन्नतीबाबत पुढील शासन निर्देश मिळेपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नयेत, अशा सूचना प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिल्या आहेत.

पदोन्नती प्रक्रियेबाबत प्राथमिक शिक्षण संचालनालयाने १४ मे रोजी परिपत्रक प्रसिद्ध केले होते. सर्वोच्च न्यायालयाने शिक्षकांना पदोन्नतीसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण असणे आवश्यक केले आहे. तसेच, राज्यातील शिक्षकांकडून उच्च न्यायालयात दाखल याचिकांमध्ये विविध न्यायनिवाड्यांमध्ये शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे शिक्षकांची विस्तार अधिकारी,केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, पदवीधर शिक्षक या



पदांवर पदोन्नती करताना शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या शिक्षकांचा सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीसाठी विचार करावा. पदोन्नतीसाठी १ सप्टेंबर २०२५ रोजीची पात्रता विचारात घ्यावी, त्यासाठी १ सप्टेंबर २०२५च्या ज्येष्ठता सूचीच्या आधारे पदोन्नतीची कार्यवाही करावी, अशा सूचना या परिपत्रकाद्वारे देण्यात आल्या होत्या. या परिपत्रकाला उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान देण्यात आले.

न्यायालयात दाखल याचिकेवर खंडपीठाने नुकताच निकाल दिला. ‘टीईटी, सीटीईटी पात्रता मिळाल्यामुळे शिक्षकाची ज्येष्ठता बदलत नाही. ज्येष्ठता आणि पदोन्नतीसाठीची पात्रता या दोन स्वतंत्र बाबी असून, पात्रता मिळाल्याच्या आधारे कनिष्ठ शिक्षकाला ज्येष्ठ शिक्षकाच्या पुढे स्थान देता येणार नाही,’ असे स्पष्ट करून, ‘एक सप्टेंबरचा ‘कट-ऑफ’ दिनांक ठरवून पात्र शिक्षकांना पदोन्नतीपासून दूर ठेवणे कायद्याशी सुसंगत नाही. पदोन्नती प्रक्रिया सुरू होण्याच्या दिवशी पात्रता असणे पुरेसे आहे,’ असे न्यायालयाने नमूद केले आणि प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे १४ मे रोजीचे परिपत्रक रद्द केले. न्यायालयाने राज्य सरकारला नव्याने धोरण आखण्याचे निर्देशही दिले.

या पार्श्वभूमीवर, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी राज्यातील विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी यांना पदोन्नती प्रक्रिया स्थगित करण्याच्या सूचना परिपत्रकाद्वारे दिल्या. त्यानुसार, राज्यातील विस्तार अधिकारी,केंद्रप्रमुख,मुख्याध्यापक , पदवीधर शिक्षक यांच्या पदोन्नतीबाबत प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे १४ मे रोजीचे पत्र उच्च न्यायालयाने रद्द केले आहे. त्यामुळे विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, पदवीधर शिक्षक यांच्या पदोन्नतीबाबत पुढील शासन निर्देश मिळेपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये, असे नमूद करण्यात आले आहे.


# ॲसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एंटरप्राइज लि.

ACRE MAKING ASSETS WORK

**नोंदणीकृत कार्यालय :** 14वा मजला, इरॉस कॉर्पोरेट टॉवर, नेहरू प्लेस, नवी दिल्ली - 110019. **टेली. : 91-11-43115600 फॅक्स : 91-11-43115618.**
**कॉर्पोरेट कार्यालय :** युनिट क्र. 502, सी विंग, वन बीकेसी, रेडियस डेव्हलपर्स, प्लॉट क्र. सी-66, जी-ब्लॉक वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - 400051. **टेली. : 022 68643101 ई-मेल : acre.arc@acreindia.in वेबसाइट : www.acreindia.in CIN : U65993DL2002PLC115769**

## परिशिष्ट IV - A अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 8(6) आणि 9(1) च्या तरतुदीसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार, सह-कर्जदार, गहाणदार आणि जामीनदार यांना सूचना देण्यात येते की, खाली वर्णन केलेल्या अचल मालमत्ता ज्या **ॲसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एंटरप्राइज लिमिटेड [CIN : U65993DL2002PLC115769]** ("सुरक्षित धनको") यांच्याकडे तारण / भारग्रस्त असून, या मालमत्तांचा प्रत्यक्ष ताबा सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, तसेच खालील कर्जदार, सह-कर्जदार, गहाणदार आणि जामीनदारांकडून सुरक्षित धनको यांना देय रकमेच्या वसुलीसाठी **‘जसे आहे जेथे आहे’, ’जसे आहे जे आहे’ आणि ’तेथे जे काही आहे’** तत्वावर या मालमत्तांची विक्री करण्यात येईल, सोबत जोडलेल्या तक्त्यात नमूद केलेली राखीव किंमत आणि बयाणा रक्कम ठेव देय असेल.

**सुरक्षित मालमत्तेचा तपशील**

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. आणि एसीआरई ट्रस्टचे नाव | कर्जदार / सह-कर्जदार / गहाणदार / जामीनदार यांचे नाव | 02 जून 2026 रोजी नुसार एकूण थकबाकी देय | राखीव किंमत | बयाणा रक्कम | डिमांड ड्राफ्ट / आरटीजीएस / एनईएफटी द्वारे ईएमडी भरण्यासाठी बँक तपशील | लिलाव दिनांक आणि वेळ | बयाणा रक्कम दिनांक व वेळ | सुरक्षित मालमत्तेचे वर्णन | पीडीएफ पाहण्यासाठी बारकोड स्कॅन करा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कर्ज खाते क्र. आणि एसीआरई ट्रस्टचे नाव - AFH0008 00415884 एसीआरई 166 ट्रस्ट | निलम माणिक सांडभोर माणिक आनंदराव सांडभोर | रु. 2885800.38/- रुपये अठ्ठावीस लाख पंच्याऐंशी हजार आठशे आणि अडतीस पैसे फक्त | रु. 15,00,000/- रुपये पंधरा लाख फक्त | रु. 1,50,000/- रुपये एक लाख पन्नास हजार फक्त | खाते नाव : एसीआरई-166-ट्रस्ट खाते क्रमांक : 0901102000042112 बँक : आयडीबीआय बँक आयएफएससी : IBKL0000901 | 28 जुलै 2026 दु. 2:30 ते दु. 3:30 | 27 जुलै 2026 दु. 4:00 पर्यंत | फ्लॅट क्र. 908 क्षेत्रफळ 607 चौ. फू. म्हणजे 56.41 चौ. मी. नवव्या मजल्यावर, "पंचवटी" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या योजनेत विंग "ए" गट क्र. 1904 आणि 1912 चाकण येथे तालुका : खेड, जिल्हा : पुणे | |
| 2 | H402HLT 1156540 / H402HHL 1152995 एसीआरई 178 ट्रस्ट | सुरज सुरेश परब स्नेहा सुरज परब | रु. 2151908.42/- रुपये एकवीस लाख एक्कावन्न हजार नऊशे आठ आणि बेचाळीस पैसे फक्त | रु. 13,00,000/- रुपये तेरा लाख फक्त | रु. 1,30,000/- रुपये एक लाख तीस हजार फक्त | बँक खाते नाव : एसीआरई-178-ट्रस्ट खाते क्रमांक : 0901102000042617 बँक : आयडीबीआय बँक आयएफएससी : IBKL0000901 | 19 ऑगस्ट 2026 दु. 2:30 ते दु. 3:30 | 18 ऑगस्ट 2026 दु. 4:00 पर्यंत | अनुसूची अ (सदर फ्लॅट/युनिट चे वर्णन) फ्लॅट /युनिट क्र. ए1-908, नवव्या मजल्यावर स्थित क्षेत्रफळ 16.73 चौ. मी. (कार्पेट) सोबत "मंत्रा सिटी 360" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पातील "ए1" इमारती मधील सर्व सामायिक प्रतिबंधित क्षेत्रांच्या वापराच्या वाटप केलेल्या हक्कासह असलेले क्षेत्र, जे अनुसूची "क" मध्ये उल्लेखित जमिनीवर बांधलेले सोबत बंदिस्त बाल्कनी क्षेत्रफळ 8.61 चौ. मी. आणि टेरेस क्षेत्रफळ 2.33 चौ. मी. अनुसूची ब सध्याचा फेज / प्रकल्प 4940.68 चौरस मीटर एफएसआय वापरून विकसित केला जात आहे आणि ते अनुसूची ’क’ मध्ये वर्णन केलेल्या जमिनीवर स्थित. अनुसूची क (सदर संपूर्ण जमिनीचे वर्णन) पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे गाव मौजे तळेगाव दाभाडे, तालुका मावळ येथे स्थित जमीन, तळेगाव दाभाडे नगर परिषद आणि उप निबंधक, मावळ च्या अधिकारक्षेत्रात संबंधित सर्व्हे क्र. 389/1/ए, (जुना स. क्र. 646), एकूण मोजमाप 6 हेक्टर 61 आर त्यापैकी मोजमाप क्षेत्रफळ 5 हेक्टर 79 आर ही विषयाधीन मालमत्ता आहे चतुःसीमा पुढीलप्रमाणे - पूर्व : उर्वरित क्षेत्र स. क्र. 389/1/ए भाग आणि स. क्र. 388 आणि रस्ता, पश्चिम : डीपी रस्ता, स. क्र. 389/1/बी आणि स. क्र. 428, दक्षिण : स. क्र. 390 आणि रस्ता, उत्तर : नाला | |
| 3 | H402HLT 1183272 / H402HHL 1178877 एसीआरई 178 ट्रस्ट | कृष्णात काशिनाथ चौगले राधिका कृष्णात चौगले | रु. 3618136.89/- रुपये छत्तीस लाख अठरा हजार एकशे छत्तीस आणि एकोणनव्वद पैसे फक्त | रु. 19,90,000/- रुपये एकोणीस लाख नव्वद हजार फक्त | रु. 1,99,000/- रुपये एक लाख नव्याण्णव हजार फक्त | बँक खाते नाव : एसीआरई-178-ट्रस्ट खाते क्रमांक : 0901102000042617 बँक : आयडीबीआय बँक आयएफएससी : IBKL0000901 | 19 ऑगस्ट 2026 दु. 2:30 ते दु. 3:30 | 18 ऑगस्ट 2026 दु. 4:00 पर्यंत | अनुसूची ’I’ पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, प्लॉट क्र - 4 आणि 5 सिटी सर्व्हे क्र. 1845 आणि 1846 स. क्र. 24 जुना आणि 26 नवीन पैकी, मोजमाप 468.9 चौ. मी. आणि 468.9 चौ. मी. सिटी सर्व्हे रेकॉर्ड नुसार, आनंदनगर मध्ये स्थित आणि तळेगाव दाभाडे नगर परिषदेच्या हद्दीत ता. - मावळ जिल्हा - पुणे आणि नोंदणी जिल्हा पुणे उप नोंदणी तालुका मावळ जिल्हा - पुणे आणि चतुःसीमा पुढीलप्रमाणे - प्लॉट क्र -4 करिता चतुःसीमा : पूर्व किंवा त्या दिशेने : सिटी सर्व्हे क्र - 1844, दक्षिण किंवा त्या दिशेने : सिटी सर्व्हे क्र - 1858, पश्चिम किंवा त्या दिशेने : सिटी सर्व्हे क्र - 1846, उत्तर किंवा त्या दिशेने : तळेगाव चाकण रस्ता. प्लॉट क्र - 5 करिता चतुःसीमा : पूर्व किंवा त्या दिशेने : सिटी सर्व्हे क्र - 1845, दक्षिण किंवा त्या दिशेने : सिटी सर्व्हे क्र - 1846, पश्चिम किंवा त्या दिशेने : सिटी सर्व्हे क्र - 1857, उत्तर किंवा त्या दिशेने : तळेगाव चाकण रस्ता. अनुसूची ’II’ फ्लॅट परिसर संबंधित फ्लॅट क्र - 02 मोजमाप 56.18 चौ. मी. म्हणजे 605 चौ. फू. अमेय निवास सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पहिल्या मजल्यावर स्थित (ज्यामध्ये बाल्कनीज आणि जिने, लँडिंग, सामायिक जागा, लॉबी इ. चे प्रमाणशीर अविभाजित क्षेत्रफळ आणि भिंतीखालील क्षेत्र याचा समावेश) सोबत सदर प्लॉट चे सदस्य म्हणून हस्तांतरकाला उपलब्ध असलेले सर्व संलग्नता हक्क. | |
| 4 | 100417 20233 एसीआरई 158 ट्रस्ट | व्हीआयपीएसवॉलेट प्रायव्हेट लिमिटेड किरण अनारसे विनोद खुटे | रु. 10121906.42/- रुपये एक कोटी एक लाख एकवीस हजार नऊशे सहा आणि बेचाळीस पैसे फक्त | रु. 89,50,000/- रुपये एकोणनव्वद लाख पन्नास हजार फक्त | रु. 8,95,000/- रुपये आठ लाख पंच्याण्णव हजार फक्त | बँक खाते नाव : एसीआरई-158-ट्रस्ट खाते क्रमांक : 0901102000042617 बँक : आयडीबीआय बँक आयएफएससी : IBKL0000901 | 19 ऑगस्ट 2026 दु. 2:30 ते दु. 3:30 | 18 ऑगस्ट 2026 दु. 4:00 पर्यंत | बाब - 1 पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, दुकान / युनिट / मल्टीपर्पज हॉल क्र. 1, तिसऱ्या मजल्यावर, मोजमाप 71.70 चौ. मी. (कार्पेट क्षेत्रफळ), सोबत झाकलेली पार्किंग जागा क्र. 1, "अंबर प्लाझा" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारत/प्रकल्पा मध्ये जमीन संबंधित स. क्र. 12 आणि 11/5 पैकी सुविधा जागेवर बांधलेले, महसूल गाव आंबेगाव बु., ता. हवेली, जिल्हा पुणे येथे स्थित, जे ग्रामपंचायत आंबेगाव बु. च्या स्थानिक हद्दीत, तालुका हवेली, जिल्हा पुणे आणि उप-निबंधकाच्या अधिकारक्षेत्रात, तालुका हवेली, जिल्हा पुणे, महाराष्ट्र - 411046, आणि चतुःसीमा पुढीलप्रमाणे : पूर्व : इमारत जागा, पश्चिम : रस्ता, उत्तर : खुली जागा, दक्षिण : खुली जागा. बाब -2 पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, दुकान/युनिट/मल्टीपर्पज हॉल क्र. 2, तिसऱ्या मजल्यावर, मोजमाप 67.69 चौ. मी. (कार्पेट क्षेत्रफळ). सोबत झाकलेली पार्किंग जागा क्र. 2, "अंबर प्लाझा" नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारत / प्रकल्पात जमीन संबंधित स. क्र. 12 आणि 11/5 पैकी सुविधा जागेवर बांधलेले, महसूल गाव आंबेगाव बु., तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे स्थित, जे ग्रामपंचायत आंबेगाव बु. च्या स्थानिक हद्दीत, तालुका हवेली, जिल्हा पुणे आणि उप-निबंधकाच्या अधिकारक्षेत्रात, तालुका हवेली, जिल्हा पुणे महाराष्ट्र - 411046, आणि चतुःसीमा पुढीलप्रमाणे : पूर्व : इमारत जागा, पश्चिम : रस्ता, उत्तर : खुली जागा, दक्षिण : खुली जागा. | |

| | |
|---|---|
| 1. ईएमडी पेमेंट डिमांड ड्राफ्ट/ आरटीजीएस/ एनईएफटी मार्फत, वर नमूद केलेल्या बँक खात्यांच्या नावे काढले/ अदा केले जावे. | |
| 2. लिलावासाठी वेबसाईट - | https://www.bankeauctions.com |
| 3. संपर्क तपशील - | 1800-209-2989 / auction.support@acreindia.in / rohan.sawant@acreindia.in |
| 4. मालमत्तेची पाहणी केवळ पूर्व-नियोजित भेटीच्या परवानगी नुसार करता येईल. | |
| 5. विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी, कृपया www.acreindia.in / www.bankeauctions.com या वेबसाईटला भेट द्या. | |

दिनांक : 12.07.2026, ठिकाण : पुणे — स्वा/- प्राधिकृत अधिकारी, ॲसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एंटरप्राइज लिमिटेड


## पत्नीशी झालेल्या वादातून घर पेटवले

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पत्नीशी वाद झाल्याने एकाने घरातील साहित्य पेटवून दिल्याची धक्कादायक घटना सिंहगड रस्त्यावरील सावित्रीबाई फुले वसाहतीत घडली. घरातील साहित्याने पेट घेतल्याने तीन पाळीव मांजरांचा मृत्यू झाला, तसेच गृहोपयोगी साहित्य जळून भस्मसात झाले.

याबाबत एका महिलेने पर्वती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, पतीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला आणि पती यांच्यात गेल्या काही दिवसांपासून वाद सुरू होते. त्यांच्यात ९ जुलै रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास पुन्हा वाद झाला. वादातून पतीने घरातील साहित्य पेटवून दिले. साहित्याने पेट घेतल्यानंतर पत्नी घाबरून घरातून बाहेर पळाली. आगीत गृहोपयोगी साहित्य, तसेच त्यांनी पाळलेल्या तीन पाळीव मांजरांचा मृत्यू झाला.

घराला आग लागल्याची माहिती मिळाल्यानंतर रहिवाशांनी तेथे धाव घेतली. पाणी ओतून आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत पत्नीला कोणतीही इजा झाली नाही. घर पेटल्यानंतर आरोपी पती पसार झाला.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र सहाणे यांनी घटनास्थळी भेट दिली. सहायक पोलीस निरीक्षक सुभाष महाले तपास करत आहेत.